24 JUL 2024


सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. बाळकृष्ण यांच्याकडून शैक्षणिक-सांस्कृतिक जीवन समृद्ध

## डॉ. अरुण भोसले; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी प्राचार्य बाळकृष्ण व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प गुंफताना डॉ. अरुण भोसले. शेजारी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. अवनीश पाटील.

कोल्हापूर, ता. २३ : प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांनी कोल्हापूरचे शैक्षणिक-सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्याची अजरामर कामगिरी बजावली आहे, असे प्रतिपादन इतिहासाचे अभ्यासक डॉ. अरुण भोसले यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, शाहू संशोधन केंद्रातर्फे आयोजित प्राचार्य बाळकृष्ण व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प गुंफताना डॉ. भोसले बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची चर्चा सध्या करतो आहोत. पण, सुमारे शतकभरापूर्वी शिक्षणाच्या क्षेत्रात नवीन आधुनिक प्रवाह आणणारे विद्वान म्हणजे डॉ. बाळकृष्ण होते.'

शिवचरित्राचा महाप्रकल्प डॉ. बाळकृष्ण यांनी अथक परिश्रमांनी साकारल्याचे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी प्रास्ताविकात सांगितले. यावेळी डॉ. आर. बी. पाटील, एम. ए. लोहार, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, मंजुश्री पवार, देविकाराणी पाटील, दत्ता मचाले उपस्थित होते. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी आभार मानले.

24 JUL 2021 पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित स्कोपस व निम्बसविषयी जागरूकता कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. धनंजय सुतार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, गिरीश कुलकर्णी.

# आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन आवश्यक

- प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील
- बॅ. खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रातर्फे जागरूकता कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा लौकिक जागतिक स्तरावर प्रकाशित होणाऱ्या संशोधनाच्या दर्जामुळे सातत्याने उंचावत आहे. त्यामुळे संशोधकांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमध्ये संशोधन प्रकाशित व्हावे, यासाठी दर्जेदार संशोधन करावे, असे आवाहन ज्येष्ठ शास्त्रज्ञ, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी एकदिवसीय 'स्कोपस व निंबस याविषयी जागरुकता कार्यक्रम' आयोजित करण्यात आला. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, आधुनिक काळात सर्व प्रकारचे ई-रिसोर्सेस उपलब्ध आहेत. यामुळे संशोधनाचा दर्जा उंचावणे शक्य झाले आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठासह देशातील महत्त्वाच्या विद्यापीठांचा संशोधकीय वेध घेतला असता भौतिकशास्त्र, मटेरियल सायन्स, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र अशा निवडक विषयांतील संशोधनाची संख्या अत्यधिक असल्याचे जाणवते.

ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. रूपाली भोसले व एस. डी. हजारे यांनी सूत्रसंचालन केले. ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील यांनी आभार मानले. उद्घाटन सत्रानंतर मुंबईच्या ग्लोबल इन्फॉर्मेशन सिस्टीम टेक्नॉलॉजी (जिस्ट) या कंपनीचे संचालक गिरीश कुलकर्णी यांनी निम्बसच्या उपयोजनाविषयी तर नवी दिल्लीच्या एल्सव्हियरच्या कस्टमर कन्सल्टंट ऐश्वर्या नायल यांनी स्कोपसच्या उपयोजनाविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. एस.व्ही. थोरात, डॉ. वाय. जी. जाधव यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JUL 2024
पुढारी

# लोकमान्य टिळक यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त वं लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. विद्या कट्टी, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. शशिकांत पंचगल्ले, डॉ. मच्छिंद्र गोफणे, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, गजानन पळसे उपस्थित होते.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JUL 2024
पुण्यनगरी

# पोवार यांचे कार्य प्रेरणादायी : कुलगुरू

**नवे पारगाव : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात शिक्षण घेऊनही डॉ. रणजित पोवार यांनी स्वकर्तृत्वाने प्रगतीचे यशोशिखर सर केले. त्यांचे हे यश समाजातील इतर युवक आणि विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

वाठार तर्फे वडगाव येथे सत्कार समारंभात ते बोलत होते. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली येथे डॉ. रणजित पोवार यांची वरिष्ठ कृषी अभियंता



पदावर निवड झाल्याबद्दल पाटबंधारेचे कार्यकारी अभियंता डी. डी. शिंदे यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी माजी उपसरपंच राहुल पोवार व पोवार कुटुंबीय उपस्थित होते. इन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया, कोलकाता यांचा यंग इंजिनिअर अॅवॉर्ड, इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर कोल्हापूर यांचा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर बेस्ट इंजिनिअर अॅवॉर्ड, कृषिथॉन नाशिकचा यंग सायंटिस्ट अॅवॉर्ड मिळाले आहेत.

24 JUL 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शास्त्रीय गायनाने रसिक मंत्रमुग्ध

## विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात रंगली धृपद गायन मैफल

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

बाहेर पडणारा मुसळधार पाऊस आणि सभागृहात रंगलेली 'मियाँ मल्हार' रागातील भारदस्त आवाज व स्वरांनी सजलेली नोमतोम याच्या अनोख्या आनंदात रंगलेली शास्त्रीय संगीताची मैफल रसिकांनी अनुभवली, रसीक मंत्रमुग्ध झाले. निमित्त होतं शिवाजी विद्यापीठ, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने आयोजित केलेली धृपद गायनाची सांगीतिक मैफिल. भारतीय संगीतातील अभिजात गायकी म्हणून धृपद धमार गायन परंपरेची ओळख आहे. या गायकी प्रकाराचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा या हेतूने 'धृपद गायन' मैफिलीचे आयोजन संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे करण्यात आले होते.

मैफिलीमध्ये प्रसिद्ध धृपद गायक पंडित उदय भवाळकर यांचे शिष्य अविजित कुंडू (बांगलादेश) व टिंकू कुमार शील' (बांगलादेश) या दोन तरुण गायकांनी कला सादर केली. त्यांनी मैफिलीची सुरवातीला 'मियाँ मल्हार'रागाने केली. सुरुवातीला धीरगंभीर व भारदस्त आवाजात संथ नोमतोम, रिद न न चे गमकयुक्त उच्चारण, मिंड, खेंच यांसारख्या अलंकारांनी हळूहळू नोमतोमची गती वाढवून रागाचं अतिशय रंजक वातावरण या दोन धृपद गायकांनी तयार केले. त्यांतर धमार तलातील 'बुंदन भिजे सारी" ही बंदिश गायली. त्यानंतर रसिकांच्या आग्रहाखातर देस रागातील सुल्फाक्ता तालात निबद्ध 'तू करतर तू आधार' हे धृपद गायलं. पखवाजाची साथसंगत व तालयोगी पंडित सुरेश तळवलकर यांचे शिष्य प्रशांता भौमिक (बांगलादेश) यांनी केली. तानपुऱ्याची साथ अनिकेत निरमले यांनी केली. प्रास्ताविक अतुल परीट यांनी केले. कलाकारांचा सत्कार अधिविभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केला. ध्वनि व-प्रकाश व्यवस्था मल्हार जोशी व विक्रम परीट यांनी पाहिली. यावेळी गायनाचार्य पंडित सुधीर पोटे, डॉ. अनमोल कोठाडिया, डॉ. कात्रे, गायिका गौतमी चिपळूणकर, विजय जाधव, अमरीष कुडाळकर आदी होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात धृपद गायन मैफलीत शास्त्रीय गायन करताना कलाकार.**

24 JUL 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठातील संगीत आणि नाट्यशास्त्र अधिविभागाने आयोजित केलेल्या मैफलीत अविजित कुंडू व टिंकू कुमार शील यांनी धृपद गायन सादर केले.

# विद्यापीठात धृपद-धमार मैफल

## संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग : बांगलादेशच्या गायकांची कला

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : बाहेर पडणारा मुसळधार पाऊस आणि सभागृहात रंगलेली 'मियाँ मल्हार' रागातील भारदस्त आवाज व स्वरांनी सजलेली नोमतोम याच्या अनोख्या आनंदात रंगलेली शास्त्रीय संगीताची मैफल मंगळवारी रसिकांनी अनुभवली. निमित्त होते शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने आयोजित केलेल्या धृपद गायनाच्या सांगीतिक मैफलीचे.

या मैफलीत अविजित कुंडू (बांगलादेश) व टिंकू कुमार शील (बांगलादेश) या दोन तरुण गायकांनी कला सादर केली. त्यांनी मैफलीची सुरुवातीला 'मियाँ मल्हार' रागाने केली. सुरुवातीला धीरगंभीर व भारदस्त आवाजात संथ नोमतोम, रिद न न चे गमकयुक्त उच्चारण, मिंड, खेंच यांसारख्या अलंकारांनी हळूहळू नोमतोमची गती वाढवून रागाचे अतिशय रंजक वातावरण या दोन धृपद गायकांनी तयार केले. धमार तलातील 'बुंदन भिजे सारी' ही बंदिश गायली.

त्यानंतर, देस रागातील सुलताल तालात निबद्ध 'तू करतार तू आधार है' धृपद गायले. त्यांना पखवाजाची साथ प्रशांता भौमिक (बांगलादेश) यांनी केली. तानपुऱ्याची साथ अनिकेत निरमले यांनी केली. अतुल परीट यांनी प्रास्ताविक केले. प्र.विभागप्रमुख डॉ.विनोद ठाकूरदेसाई यांनी कलाकारांचा सत्कार केला. यावेळी सुधीर पोटे, डॉ.अनमोल कोठाडिया, गौतमी चिपळूणकर, विजय आयरे, अमरीश कुडाळकर उपस्थित होते.

24 JUL 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात रंगली धृपद-धमार गायनाची मैफल

कोल्हापूर, ता. २३ : बाहेर पडणारा मुसळधार पाऊस आणि सभागृहात रंगलेली 'मियाँ मल्हार' रागातील भारदस्त आवाज, स्वरांनी सजलेली नोमतोम याच्या अनोख्या आनंदात रंगलेली शास्त्रीय संगीताची मैफल आज रसिकांनी अनुभवली. निमित्त होतं शिवाजी विद्यापीठ, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने आज आयोजित केलेली धृपद गायनाची सांगीतिक मैफल.

भारतीय संगीतातील अभिजात गायकी म्हणून धृपद धमार गायन परंपरेची ओळख आहे. या गायकी प्रकाराचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा, या हेतूने 'धृपद गायन' मैफलीचे आयोजन संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे करण्यात आले होते.

या मैफलीमध्ये अविजित कुंडू, टिंकू कुमार शील' (बांगलादेश) या दोन तरुण गायकांनी आपली कला सादर केली. त्यांनी मैफलीची सुरुवात 'मियाँ मल्हार' रागाने केली. सुरुवातीला धीरगंभीर व भारदस्त आवाजात संथ नोमतोम, रिद न न चे गमकयुक्त उच्चारण, मिंड, खेंच यांसारख्या अलंकारांनी हळूहळू नोमतोमची गती वाढवून रागाचं अतिशय रंजक वातावरण या दोन धृपद गायकांनी तयार केलं. त्यानंतर धमार तलातील 'बुंदन भिजे सारी' ही बंदिश गायली. त्यानंतर रसिकांच्या आग्रहाखातर देस रागातील सुल्फाक्ता तालात निबद्ध 'तू करतर तू आधार' हे धृपद गायलं. या दोन्ही कलाकारांना पखवाजाची साथसंगत प्रशांता भौमिक (बांगलादेश) यांनी केली. तानपुऱ्याची साथ अनिकेत निरमले यांनी केली. अतुल परीट यांनी प्रास्ताविक केले. कलाकारांचा सत्कार डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केला. या कार्यक्रमाला गायनाचार्य पंडित सुधीर पोटे, डॉ. अनमोल कोठाडिया, गौतमी चिपळूणकर, विजय जाधव, अमरिश कुडाळकर उपस्थित होते. ध्वनी व प्रकाश व्यवस्था मल्हार जोशी व विक्रम परीट यांनी पाहिली.




शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागामध्ये मंगळवारी धृपद-धमार गायनाची मैफल रंगली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JUL 2024

लोकमत

# विद्यापीठात मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू

कोल्हापूर : विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, इतिहास अधिविभाग यांच्यामार्फत २४ जुलै ते १२ ऑगस्ट या कालावधीत मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

अभ्यासक्रमाचा कालावधी सहा महिन्यांचा असून, प्रवेशाकरिता शैक्षणिक पात्रता पदवी आहे. शिवपूर्वकाळापासून ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची, तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषेबरोबरच मोडी लिपी मुख्य लिपी असल्याने या काळाबाबतचा इतिहास अभ्यासण्यासाठी ही मोडी लिपी ज्ञात असल्याशिवाय संशोधन होऊच शकत नाही. ही काळाची गरज लक्षात घेऊन मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र इतिहास अधिविभाग यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, इतिहास अभ्यासक, इतिहासप्रेमी यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले.